# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१

दूरध्वनी क्रमांक २२६१७९६९, फॅक्स : २२६९०००

E-mail : desk18@dtemaharashtra.gov.in Internet :http//www.dte.org.in


का.क्र १८ /तंशिसं/डिबीटी जाहीरात /२०१७/९१ दिनांकः २८.०६.२०१७

## तंत्र शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई मार्फत विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना

### ➢ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना :-

- मान्यता प्राप्त संस्थांमध्ये पात्र व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेणारे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थी केवळ निधी अभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांपासून वंचित राहू नयेत म्हणून, एक सामाजिक बांधिलकी व घटनात्मक उत्तरदायित्व म्हणून महाराष्ट्र शासनाचा धोरणात्मक निर्णय.
- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, दि. १३ ऑक्टोबर, २०१६ अन्वये मान्यता प्राप्त व्यावसायिक व उच्च शिक्षण अभ्यासक्रमात शिकणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राज्य शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.६.०० लाखापर्यंत आहे अशा विद्यार्थ्यांनी व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश घेतल्यास त्यांना शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के शिष्यवृत्ती म्हणून अदा करण्यात येईल.
- विद्यार्थ्यांना सदरची शिष्यवृत्ती ही सुलभ पध्दतीने व तात्काळ अदा करता यावी , याकरिता शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून ही रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.
- पालकांचे वार्षिक उत्पन्न मर्यादा :-

  **अ)** रु.२.५० लाख व त्यापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न आहे अशा विद्यार्थ्यांसाठी पात्रता परीक्षेतील (दहावी / बारावी / पदविका) गुणांच्या टक्क्यांची अट लागू नाही.

  **ब)** - रु.२.५० लाखापेक्षा अधिक ते रु.६.०० लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न आहे अशा विद्यार्थ्यांसाठी पात्रता परीक्षेतील (दहावी / बारावी) गुण ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक.

  - थेट व्दितीय वर्षात निवडक पदवी अभ्यासक्रमांसाठी पदविका अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेत एकुण गुण ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक.
  - दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी गुणांच्या टक्क्यांची अट लागू नाही.

### ➢ डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना :-

दि. १३ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयाद्वारे डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून सुरु करण्यात आली असून, राज्यातील अल्पभूधारक शेतकरी व नोंदणीकृत मजूर यांच्या महानगरातील संस्थांमध्ये शिक्षण घेणा-या पाल्यांना प्रतिवर्ष रु.३०,०००/- व इतर ठिकाणी शिक्षण

घेणा-या पाल्यांना प्रतिवर्ष रु.२०,०००/- इतका वसतिगृह निर्वाह भत्ता सुलभ पध्दतीने तात्काळ उपलब्ध करुन देण्यासाठी आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

## ➢ उच्च व्यावसायिक व इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना :-

अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासनामार्फत राज्यातील **मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शिख, पारशी, जैन** व **ज्यू** या अल्पसंख्यांक समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल व गुणवत्ताधारक व तांत्रिक व व्यावसायिक (पदविका, पदवी व पदव्युत्तर) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता लागू असलेली शिष्यवृत्ती योजना. वर्ष २०१७-१८ पासून सदरची शिष्यवृत्ती (जास्तीत जास्त रू.२५,०००/-) ही विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

- ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.६.०० लाखापर्यंत आहे व ज्या विद्यार्थ्यांने दहावी महाराष्ट्र राज्यातून उत्तीर्ण केलेली आहे अशा विद्यार्थ्यांसाठी.

**टिप :-** वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज **राज्यस्तरीय डिबीटी पोर्टल** वर भरावयाचे आहेत. पात्रतेचे निकष तंत्रशिक्षण संचालनालयाचे संकेतस्थळ - www.dtemaharashtra.gov.in वर उपलब्ध आहेत.

सही /-

नोडल ऑफिसर तथा संचालक,

तंत्रशिक्षण, म.रा. मुंबई